“स्वावलंबी शिक्षण हेच आमचे-ब्रीद” -कर्मवीर





# रयत शिक्षण संस्थेचे,

# राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर.

## मराठी विभाग २०२२-२३

## परिमल भित्तीपत्रक अंक – दुसरा

# वाङ्मय मंडळ उद्घाटन विशेषांक




उद्घाटन : बुधवार दिनांक २४ ऑगस्ट २०२२

माय मराठी, साद मराठी, भाषांचा भावार्थ मराठी I
बात मराठी, साथ मराठी, जगण्याला या अर्थ मराठी II

## संपादक मंडळ

चि. अमर कस्तुरे B.A-II
चि. ऋतिक कांबळे B.A-II
चि. आदित्य कांबळे B.A-II
चि. प्रतिक पाटील B.A-II

कु. गायत्री बुरुड B.A-II
कु. ऋतुजा कांबळे B.A-II
कु. शुभांगी पाटील B.A-II
कु. अबोली हेडगे B.A-II

# मार्गदर्शक

**डॉ.महेश रणदिवे**
(सहा.प्राध्यापक, मराठी विभाग)

**श्री.अंकुश घुले**
(सहा.प्राध्यापक, मराठी विभाग)

**प्रो.डॉ.सिंधू आवळे**
(प्रमुख, मराठी विभाग)

**प्रो.डॉ.भाग्यश्री पुणतांबेकर**
(प्रमुख, कला शाखा)

**प्रो.डॉ. व्ही,व्ही.किल्लेदार**
(उपप्राचार्य)


**डॉ.मनीषा आझाद नायकवडी**
(सहा.प्राध्यापक, न्यू कॉलेज,कोल्हापूर.)

**प्रो.डॉ.एल.डी.कदम**
प्राचार्य






# वि.दा.करंदीकर



**गोविंद विनायक करंदीकर** उर्फ **'विंदा करंदीकर'**(**जन्म**: २३ ऑगस्ट १९१८ - **मृत्यू**: १४ मार्च २०१०) हे मराठीतील ख्यातनाम कवी, लेखक व समीक्षक होते. देशाच्या साहित्य क्षेत्रातला सर्वोच्च प्रतिष्ठेचा एकोणचाळिसावा ज्ञानपीठ पुरस्कार त्यांना अष्टदर्शने या साहित्यकृतीसाठी प्रदान करण्यात आला. वि.स. खांडेकर आणि कुसुमाग्रजांनंतर हा पुरस्कार मिळवणारे ते तिसरे मराठी साहित्यिक ठरले. याशिवाय करंदीकरांना महाराष्ट्र साहित्य परिषद पुरस्कार, कुसुमाग्रज पुरस्कार, कबीर सन्मान, जनस्थान पुरस्कार सारखे अनेक सन्मान व पुरस्कार देण्यात आले.

| | |
|---|---|
| **प्रसिद्ध साहित्यकृती** | अष्टदर्शने, स्वेदगंगा |

काव्यवाचनाचा प्रकार फारसा रूढ नसतानाही वसंत बापट, मंगेश पाडगावकर आणि विंदा या तिघांनी काव्यवाचनाच्या जाहीर कार्यक्रमांचे अनेक फड रंगवले आहेत. १९४९ साली प्रथम प्रकाशित झालेल्या 'स्वेदगंगा' पासून सुरू झालेला विंदांचा साहित्यिक प्रवास 'मृद्गंध', 'धृपद', 'जातक', 'विरूपिका' आदी काव्यसंग्रह; 'स्पर्शाची पालवी' आणि 'आकाशाचा अर्थ' हे दोन लघुनिबंधसंग्रह; ज्ञानेश्वरांच्या 'अमृतानुभवा'चा अर्वाचीनीकरणाचा अभिनव प्रयोग; 'परंपरा आणि नवता' हा मराठी समीक्षालेख संग्रह; फाऊस्ट, राजा लिअर आणि ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र आदी अनुवादीत ग्रंथ.

'राणीचा बाग', 'एकदा काय झाले', 'सशाचे कान', 'एटू लोकांचा देश', 'पिशी मावशी आणि तिची भुतावळ' हे काही बालकविता संग्रह. २००३ साली प्रकाशित झालेला 'अष्टदर्शने' या संग्रहापर्यंत येऊन पोहोचतो. 'अष्टदर्शने' या संग्रहात आठ तत्त्वज्ञांचे विचार त्यांनी सोप्या रचनांमध्ये मांडले आहेत. याच संग्रहाकरता त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त झाला आहे. आशयगर्भित पण सोपी शब्दरचना करणारे विंदा आपल्या कवितांतून वैश्विक सत्य धुंडाळत राहिले. त्यांची कविता प्रयोगशील आहे. विंदांच्या काव्यात व्यक्तिगत भावजीवनापासून सामाजिक वास्तवापर्यंतचे व्यापक अनुभव पाहायला मिळतात. विंदांना ललित पारितोषिक समितीचे क्रिटिक्स ॲवॉर्ड, सिनीयर फुलब्राईट, कबीर सन्मान, सोव्हिएत लँड नेहरू लिटररी ॲवॉर्ड, जनस्थान पुरस्कार तसेच साहित्य अकादमीची फेलोशिपही मिळाली आहे.

१९४९ च्या मे महिन्यात विंदांच्या 'स्वेदगंगा' या कवितासंग्रहाची पहिली आवृत्ती प्रकाशित झाली. 'स्वेदगंगा' या कवितासंग्रहात अंतर्भूत कवितांची सामाजिक आशयाची कविता, व्यक्तिचित्रणात्मक, प्रेमविषयक, बालजीवनविषयक, चिंतनात्मक, देवगड-राजापूरकडील बोलीभाषेतील कविता अशी वर्गवारी करता येऊ शकते.

# अण्णाभाऊ साठे



**तुकाराम भाऊराव साठे** (ऑगस्ट १, इ.स. १९२० - जुलै १८, इ.स. १९६९) हे **अण्णा भाऊ साठे** म्हणून ओळखले जाणारे एक मराठी समाजसुधारक, लोककवी आणि लेखक होते. साठे एका मांग समाजामध्ये जन्मलेले व्यक्ती होते. त्यांचे लेखन सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या कृतीशीलतेवर आधारलेले होते. साठे हे मार्क्सवादी-आंबेडकरवादी प्रवृत्तीचे होते, सुरुवातीला त्यांच्यावर साम्यवादाचा प्रभाव होता पण नंतर ते आंबेडकरवादी झाले.

साठे यांनी मराठी भाषेत ३५ कादंबऱ्या लिहिल्या. त्यामध्ये *फकिरा* (१९५९) समाविष्ट आहे, तिला इ.स. १९६१ मध्ये राज्य सरकारच्या उत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार मिळाला आहे. साठेंच्या लघु कथांचा संग्रह १५ आहे, ज्यामध्ये मोठ्या संख्येने बऱ्याच भारतीय भाषांमध्ये आणि २७ अ-भारतीय भाषांमध्ये भाषांतरित केल्या गेल्या आहेत. कादंबरी आणि लघुकथा यांच्याव्यतिरिक्त साठे यांनी नाटक, रशियातील भ्रमंती, १२ पटकथा आणि मराठी पोवाडा शैलीतील १० गाणी लिहिली.

साठेंच्या पोवाडा आणि लावणी यांसारख्या लोककथात्मक कथा शैलींच्या वापराने लोकांमध्ये ते लोकप्रिय बनले व त्यांचे कार्य अनेक समुदायांपर्यंत पोहोचण्यास मदत झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंजार लेखणीला अर्पण केलेल्या 'फकिरामध्ये, साठेंनी आपल्या समुदायाला पूर्ण भुखमरीपासून वाचवण्यासाठी ग्रामीण रूढिवादी प्रणाली आणि ब्रिटिश शासनाच्या विरूद्ध विद्रोह करणाऱ्या नायक फकिराला चित्रित केले. नायक आणि त्याच्या समुदायाला नंतर ब्रिटिश अधिकारी द्वारे अटक आणि छळ दिला जातो, आणि अखेरीस फकिराला फाशी देऊन ठार मारले जाते.


**कादंबरी:-** चित्रा (१९४५), फकिरा (१९५९), वारणेचा वाघ (१९६८), चिखलातील कमळ, रानगंगा, माकडीचा माळ (१९६३), वैजयंता, रत्ना, रूपा, गुलाम, चंदन, मथुरा, आवडी, वैर,पाझर.

**लोकनाट्य:-** अकलेची गोष्ट (१९४५), देशभक्त घोटाळे (१९४६), शेटजींचे इलेक्शन (१९४६), बेकायदेशीर (१९४७), पुढारी मिळाला (१९५२), लोकमंत्र्यांचा दौरा (१९५२), माझी मुंबई, कापऱ्या चोर,मूक मिरवणूक.

**नाटके:-** इनामदार (१९५८), पेंग्याचं लगीन, सुलता.

**कथासंग्रह:-** अण्णा भाऊ साठे : प्रातिनिधिक कथा (संपादक - डॉ. एस.एम. भोसले), निखारा, नवती, फरारी, पिसाळलेला माणूस, जिवंत काडतूस, आबी, खुळंवाड, गजाआड, बरबाद्या कंजारी (१९६०), चिरानगरची भुतं (१९७८), कृष्णाकाठच्या कथा.

# बालकवी



**बालकवी** ऊर्फ **त्र्यंबक बापूजी ठोंबरे** (जन्म : धरणगाव, १३ आॅगस्ट १८९०; मृत्यू : जळगाव, ५ मे १९१८) हे मराठीतील एक श्रेष्ठ निसर्गकवी होते. इ.स. १९०७ मध्ये जळगावात पहिले महाराष्ट्र कविसंमेलन झाले. या संमेलनाचे अध्यक्ष डॉ. कान्होबा रणछोडदास कीर्तिकर यांनी ठोंबऱ्यांना *बालकवी* ही पदवी दिली. बालकवींची कारकीर्द उणीपुरी दहा वर्षांची होती.

बालकवींच्या बहुतेक कवितांत निसर्ग मध्यवर्ती असला तरी रूढ अर्थाने निसर्गवर्णन हा त्यांच्या कवितांचा हेतू नाही. निसर्गाशी तादात्म्य पावलेल्या कविमनाचे ते सहजोद्गार आहेत. निसर्गातील विविध दृश्यांत त्यांना मानवी भावना दिसतात. म्हणजे हे निसर्गाचे मानवीकरण नाही किंवा अचेतन वस्तूवर चेतनारोप नाही. ‘फुलराणी’तील एक कलिका आणि सूर्यकिरण यांची नाजूक प्रीतिकथा ह्या दृष्टीने लक्षणीय आहे. ती जेवढी अतिमानवी तेवढीच मानवी आहे. ‘अरुण’मध्ये पहाट फुलते या घटनेभोवती कल्पनाशक्तीच्या विभ्रमांचे भान हरविणारे जाळे विणले आहे; पण त्या केवळ उत्प्रेक्षा नव्हेत. त्या घटनेत भाग घेणाऱ्या निसर्गातील विविध गोष्टी तिथे सजीव होतात. इतकेच नव्हे तर कवितेच्या किमयेने रसिकही त्यांच्याशी एकरूप होतात. त्यांमागील दिव्य आणि मंगल यांच्या कवितेत अलौकिकाचा स्पर्श होतो. साध्या वर्णनात प्रतिकाची गहिरी सूचना लपलेली असते. मर्ढेकरांच्या कवितेवर बालकवींचा मोठा प्रभाव होता. अगदी अलीकडच्या ग्रेस आणि ना. धों. महानोर यांसारख्या परस्परांहून भिन्न प्रकृतीच्या कवींच्या घडणीतही बालकवींचा प्रभाव जाणवेल.

विषयांचे बंधन नको, निसर्गाचे वर्णन, अज्ञेयवाद आणि गूढगुंजन, ओसाड जागेचे व रात्रीच्या भयाणपणाचे तन्मयतेने वर्णन, अतिमानुष व्यक्तींचे वर्णन, मरणाची उत्कंठा, स्वप्नाळू वृत्ती, दर्पयुक्त आशावाद, आत्मकेंद्रितता, समाजाविरुद्ध बंडखोरी, वस्तुजाताचे वर्णन करीत असताना वास्तववादाचा अवलंब न करता कल्पनावादाचा (आयडिअलिझम) अवलंब करणे.



# ना.धो.महानोर



**नामदेव धोंडो महानोर** (जन्म : पळसखेड-कन्नड तालुका-औरंगाबाद जिल्हा, १६ सप्टेंबर १९४२) हे मराठी कवी, गीतकार, शेतकरी व माजी आमदार आहेत. मराठी साहित्य परिषदेच्या वतीने पुण्यात झालेल्या पहिल्या पर्यावरणप्रेमी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. इतकेच नाही तर २४ मार्च २०१४ रोजी सुरू झालेल्या दशदिवसीय ई-साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते.

महानोरांचा जन्म महाराष्ट्रातल्या वर्तमान औरंगाबाद जिल्ह्यातील *पळसखेड* या गावी झाला. त्यांचे शालेय शिक्षण पळसखेड, पिंपळगाव, शेंदुर्णी येथे झाले. त्यानंतर जळगावातील महाविद्यालयात त्यांनी प्रवेश घेतला; मात्र त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण पहिल्या वर्षापर्यंतच झाले. महाविद्यालयीन शिक्षण सोडून शेती करायला ते आपल्या गावी परतले. मराठी साहित्यविश्वात ते 'रानकवी' म्हणून प्रसिद्ध आहेत.

- भारत सरकारचा 'पद्मश्री' पुरस्कार, इ.स.१९९१
- कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा जनस्थान पुरस्कार, इ.स. २००९
- साहित्य अकादमी पुरस्कार, इ.स. २००० - 'पानझड'
- महानोर आणि त्यांच्या पत्नी सुलोचना यांना यशवंत-वेणू पुरस्कार (२०१७)
- **साहित्यकृती :-** अजिंठा, रानातल्या कविता, पानझड, कापूस, गंगा वाहु दे निर्मळ, पक्षांचे लक्ष थवे,पावसाळी कविता, दिवेलागण्याची वेळ, पळसखेडची गाणी.




# कुसुमाग्रज



**विष्णु वामन शिरवाडकर तथा तात्यासाहेब शिरवाडकर** (२७ फेब्रुवारी, १९१२ - १० मार्च १९९९) हे मराठी भाषेतील अग्रगण्य कवी, लेखक, नाटककार कथाकार व समीक्षक होते. त्यांनी **कुसुमाग्रज** या टोपणनावाने कवितालेखन केले. ते आत्मनिष्ठ व समाजनिष्ठ जाणीव असणारे मराठीतले महत्त्वाचे लेखक मानले जातात. शिवाडकरांचे वर्णन सरस्वतीच्या मंदिरातील देदीप्यमान रत्न असे करतात. वि.स. खांडेकर यांच्यानंतर मराठी साहित्यात ज्ञानपीठ पुरस्कार मिळवणारे ते दुसरे साहित्यिक होते. त्यांचा जन्म दिवस (२७ फेब्रुवारी) हा मराठी भाषा गौरव दिन अथवा मराठी राजभाषा दिवस म्हणून साजरा केला जातो.

मराठी आभिरुचीवर चार दशकांपेक्षा अधिक काळ प्रभाव गाजविणारे श्रेष्ठ प्रतिभावंत कवी, नाटककार, कथाकार, कादंबरीकार, लघुनिबंधकार व आस्वादक समीक्षक. प्रामाणिक सामाजिक आस्था, क्रांतिकारक वृत्ती आणि शब्दकलेवरचे प्रभुत्त्व ही त्यांच्या काव्याची वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्यातल्या सखोल सहानुभूतीने त्यांना समाजाच्या सर्व थरांतील वास्तवाला भिडण्यासाठी आणि पौराणिक आणि ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांमधील मानवी वृत्तीचा शोध घेण्यासाठी प्रवृत्त केले. त्यांच्यातल्या शोधक आणि चिकित्सक स्वभावाने त्यांना प्रत्यक्ष ईश्वरासंबंधी प्रश्न उपस्थित करायला आणि माणसाच्या समग्रतेचे आकलन करायला प्रवृत्त केले. त्यांचे समृद्ध आणि प्रगल्भ व्यक्तिमत्त्व वैविध्यपूर्ण आणि प्रसन्न रूपात त्यांच्या साहित्यात प्रतिबिंबित झाले आहे. मराठी कुसुमाग्रजांच्या कविता तरुणांना प्रेरणा देणा-या आहेत. त्यांची **कणा** ही कविता युवकांना स्फूर्ती देणारी आहे.

कुसुमाग्रजांचा जन्म पुणे येथे झाला. त्यांचे मूळ नाव गजानन रंगनाथ शिरवाडकर असे होते. त्यांचे काका वामन शिरवाडकर यांनी त्यांना दत्तक घेतल्याने त्यांचे नाव विष्णु वामन शिरवाडकर असे बदलले गेले. कुसुमाग्रजांचे वडील वकील होते, वकिलाच्या व्यवसायासाठी ते पिंपळगाव बसवंत या तालुक्याच्या गावी आले, कुसुमाग्रजांचे बालपण येथेच गेले. कुसुमाग्रजांना सहा भाऊ आणि कुसुम नावाची एक लहान बहीण होती, एकुलती एक बहीण सर्वांची लाडकी म्हणून कुसुमचे अग्रज म्हणून 'कुसुमाग्रज' असे नाव त्यांनी धारण केले. तेव्हापासून शिरवाडकर कवी 'कुसुमाग्रज' या टोपण नावाने ओळखले जाऊ लागले. नाशिक येथे त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. बी.ए.ची पदवी मिळाल्यानंतर काही काळ त्यांनी चित्रपट व्यवसायात पटकथा लिहिणे, चित्रपटात छोट्या भूमिका करणे अशी कामे केली. यानंतर सोबत, स्वराज्य, प्रभात, नवयुग, धनुर्धारी, अशा विविध नियतकालिकांचे, वृत्तपत्रांचे संपादक म्हणून त्यांनी काम केले. १९३२ साली झालेल्या काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहात त्यांचा सहभाग होता. १९३३ साली त्यांनी 'ध्रुव मंडळा'ची स्थापना केली. अनेक सामाजिक चळवळीत, सत्याग्रहांमधे सहभाग घेतला. पुढील काळातही त्यांनी नाशिक जिल्ह्यातील आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत केली.



# बहिणाबाई चौधरी



बहिणाबाईंचा जन्म असोदे (जळगाव जिल्हा) ह्या गावी झाला. हे गाव खानदेशातील जळगावापासून अंदाजे ६ कि.मी. अंतरावर आहे. जन्म नागपंचमीच्या दिवशी जन्म :११ ऑगस्ट १८८० रोजी महाजनांच्या घरी झाला. त्यांच्या आईचे नाव भिमाई व वडिलांचे नाव उखाजी महाजन होते. तीन भाऊ- घमा, गना आणि घना, तीन बहिणी- अहिल्या, सीता आणि तुळसा. वयाच्या तेराव्या वर्षी जळगावचे खंडेराव चौधरी यांचे पुत्र नथुजी चौधरी यांच्याशी बहिणाबाईंचा विवाह झाला. नथुजी आणि बहिणाबाईंना तीन अपत्ये- ओंकार, सोपान आणि काशी झाली. जळगावच्या प्लेगच्या साथीत ओंकारला कायमच अपंगत्व आले. वयाच्या तिसाव्या वर्षी बहिणाबाईंना वैधव्य आले. बहिणाबाईंना लिहिता येत नव्हते, त्यामुळे त्यांनी केलेल्या अनेक कविता कुणी लिहून न ठेवल्यामुळे काळाच्या ओघात नष्ट झाल्या. काही रचना पुत्र सोपानदेव चौधरी यांनी आणि काही त्यांच्या मावसभावाने टिपून ठेवल्या. बहिणाबाईंचा वयाच्या एकाहत्तराव्या वर्षी जळगावात ३ डिसेंबर १९५१ रोजी मृत्यू झाला. त्या निरक्षर होत्या; तथापि त्यांच्याकडे जिवंत काव्यरचनेची निसर्गदत्त प्रतिभा होती. शेतकाम आणि घरकाम करता करता उत्स्फूर्तपणे "लेवा गणबोली" तील ओव्या व कविता रचून गात असत. सोपानदेव चौधरी आणि त्यांचे एक आप्त ह्यांनी जमेल तेव्हा त्या वेळोवेळी कविता तेथल्या तेथे उतरून घेतल्या आणि जपल्या. बहिणाबाईंनी ज्या वस्तूंवर काम करता करता ह्या कविता लिहिल्या आहेत. त्यातल्या काही वस्तू तसेच त्यांचे घर बहिणाबाईचा मुलगा ( ओंकार चौधरी) यांच्या सुनबाई श्रीमती पद्माबाई पांडुरंग चौधरी (बहिणाबाईंच्या नातसून) यांनी जिवापाड जतन करून ठेवलेल्या आहेत. जळगावच्या चौधरी वाड्यातील बहिणाबाईंच्या घराचं रूपांतर संग्रहालयात झालेल आहे. त्याला बहिणाबाई चौधरी मेमोरियल ट्रस्ट असे नाव देण्यात आले आहे. आज बहिणाबाईंच्या रोजच्या वापरातली शेतीची अवजारं, स्वंयपाकाच्या वस्तू, भांडी, पुजेचं साहित्य ह्यांची जपवणूक होत आहे. हा अलौकिक ठेवा पुढील पिढीला पाहता येणार आहे. अरे संसार संसार म्हणत संसारातील सुख दुःखांच्या साक्षीदार असलेल्या अनेक गोष्टी या संग्रहालयात बघायला मिळतात. हे संग्रहालय फक्त बहिणाबाईंच्या वस्तूंचं, आठवणींचंच संग्रहालय नाही तर या भागातील कृषीजन संस्कृतीत राबणाऱ्या, कष्टकरी महिलांच्या आठवणींचा, श्रमाचा हा ठेवा आहे. जळगावात जेव्हा लेखक कवी येतात तेव्हा ते आवर्जून ह्या वाड्याचं दर्शन घेतात. बहिणाबाईंच्या घराच्या उंबरठ्यावर डोकं टेकवतात, धन्य होतात आणि मनोमन बहिणाईशी नातं जोडतात. त्यांच्या याच आठवणी चिरकाल टिकतील हेच महत्त्वाचं आहे. प्रत्येकाने पहावं असं हे बहिणाबाईचं संग्रहालय आहे.



# भालचंद्र नेमाडे


मराठी साहित्यातील ज्येष्ठ कादंबरीकार, समीक्षक, कवी, अध्यापक, लघुनियतकालिक चळवळीतील एक अग्रणी कार्यकर्ते – देशीविदेशी साहित्याचे पुरस्कर्ते.भारतीय साहित्यात सर्वोच्च समजल्या जाणाऱ्या ज्ञानपीठ पुरस्काराचे मानकरी. जन्म २७ मे १९३८ रोजी जळगाव जिल्ह्यातील सांगवी या गावी झाला. १९५५ मध्ये जळगाव जिल्ह्यातील भालोदच्या न्यू इंग्लिश स्कूलमधून प्रथम श्रेणीत शालान्त परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर, पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयातून भाषा विज्ञान या विषयात एम्.ए. केल्यानंतर १९६४ मध्ये मुंबई विद्यापीठातून एम्.ए. (इंग्रजी) केले. १९८१ मध्ये औरंगाबादच्या मराठवाडा विद्यापीठातून त्यांनी पीएच्.डी. केले. अहमदनगर, धुळे, औरंगाबाद, गोवा, लंडन, मुंबई अशा विविध ठिकाणी १९६४ ते १९९८ पर्यंत ते अध्यापक. प्रपाठक, विभाग प्रमुख म्हणून कार्यरत होते. १९९१ ते १९९८ मध्ये त्यांनी मुंबई विद्यापीठाच्या गुरुदेव टागोर तौलनिक साहित्य अध्यासनमध्ये अध्यापन केले. इंग्रजी भाषा आणि साहित्य, वाङ्मयप्रकार, भाषाविज्ञान, भारतीय साहित्य, तौलनिक साहित्य, मराठी भाषा आणि साहित्य इ. त्यांचे अध्यापनाचे आणि संशोधनाचे विषय आहेत. राज्य तसेच राष्ट्रीय पातळीवरील साहित्यिक आणि सांस्कृतिक मंडळावर सल्लागार सदस्य म्हणूनही ते कार्यरत आहेत. त्यांची इंग्रजी आणि मराठी ग्रंथसंपदा विपुल आहे. नेमाडे यांच्या वाङ्मयीन कारकिर्दीची सुरुवात फेब्रुवारी १९५६ पासून झाली. ‘निळे मनोरे’ ही त्यांची पहिली कविता, फर्ग्युसन महाविद्यालयाच्या नियतकालिकात प्रथम प्रकाशित झाली. त्यांनतर विविध नियतकालिकांतून त्यांच्या कविता प्रसिद्ध होत होत्या. १९७० मध्ये *मेलडी* हा त्यांचा पहिला कवितासंग्रह प्रकाशित झाला. त्यानंतर १९९१ मध्ये *देखणी* हा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. पण त्यांना ओळख मिळाली ती १९६३ मध्ये प्रकाशित झालेल्या त्यांच्या ‘कोसला’ या कादंबरीमुळे आणि नंतरच्या त्यांच्या समीक्षालेखनामुळे,

साहित्यसंपदा :*मेलडी* (१९७०), *देखणी* (१९९१)हे कवितासंग्रह;

*कोसला* (१९६३), *बिढार* (१९७५), *झूल* (१९७९) *हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ* (२०१०) ह्या कादंबऱ्या:

*साहित्याची भाषा* (१९८७), *टीकास्वयंवर* (१९९०), *तुकाराम* (१९९४), *साहित्य, संस्कृती आणि जागतिकीकरण* (२००१) *दि इनफ्लुअन्स ऑफ इंग्लीश ऑन मराठी* (१९९०), *अ सोशिओलिंग्विस्टिक ॲन्ड स्टायलिस्टिक स्टडी*, *नेटिविझम* मराठी-इंग्रजी समीक्षात्मक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांच्या साहित्याचे इंग्रजी, हिंदी, तेलुगू, तमिळ, कन्नड, मलयाळम्, गुजराती, पंजाबी, उर्दू, उडियामध्ये अनुवाद झाले असून विशेष म्हणजे त्यांच्या झूल आणि हिंदू कादंबरीचे ब्रेल या अंधांसाठीच्या लिपीतही रूपांतर झाले आहे


पावसाच्या धारा
सोबत थंडगार वारा
आने अंगाला शहारा
परी हवा वाटणारा
बघे वर्षभर वाट
मनी भावनांही दाट
येता निसर्गाचा थाट
पसरे हिरवळ अफाट
सरीतच मग्न ध्यान
चिंतनातलं आगळंच ज्ञान
कायेत फुंकितो प्राण
डोही शांतीचीच जाण
येता चिंब भिजवितो
वैर-भांडण निजवितो
डोक्या अंधारल्या उजवितो
दु:खी मनं फुलवितो
कधी शांत कधी क्रूर
कधी दुष्काळ कधी पूर
पण कधी रुसून गेला दूर,
वाटतं आयुष्यच अधुरं


आला पाऊस मातीच्या वासांत ग
मोती गुफ़ित मोकळ्या केसांत ग
आभाळात आले, काळे काळे ढग
धारा कोसळल्या, निवे तगमग
धुंद दरवळ, धरणीच्या श्वासात ग॥
- शांता शेळके


ऋतु हिरवा, ऋतु बरवा, पाचूचा वनि रुजवा ।
युग विरही हृदयांवर सरसरते मधु शिरवा ।। ऋतु हिरवा ।।
भिजुनी उन्हे चमचमती, क्षण दिपती क्षण लपती ।
नितळ निळ्या अवकाशी मधुगंधी तरल हवा ।।
- शांता शेळके

## औदुंबर

ऐल तटावर पैल तटावर हिरवाळी घेऊन
निळासांवळा झरा वाहतो बेटाबेटांतुन.

चार घरांचे गाव चिमुकले पैल टेकडीकडे;
शेतमळ्यांची दाट लागली हिरवी गरदी पुढे.

पायवाट पांढरी तयांतुनि अडवीतिडवी पडे,
हिरव्या कुरणांमधुन चालली काळ्या डोहाकडे.

झांकळुनी जळ गोड काळिमा पसरी लाटांवर;
पाय टाकुनी जळात बसला असला औदुंबर.

- बालकवी

## या नभाने

ह्या नभाने ह्या भुईला दान द्यावे
आणि ह्या मातीतुनी चैतन्य गावे
कोणती पुण्ये अशी येती फळाला
जोंधळ्याला चांदणे लखडून जावे

ह्या नभाने ह्या भुईला दान द्यावे
आणि माझ्या पापणीला पूर यावे
पाहता ऋतुगंध कांती सांडलेली
पाखरांशी खेळ मी मांडून जावे

गुंतलेले प्राण ह्या रानांत माझे
फाटकी ही झोपडी काळीज माझे
मी असा आनंदुनी बेहोष होता
शब्दगंधे, तू मला बाहूत घ्यावे!

## संपादकीय :

वाङ्मय मंडळ उद्घाटनाचे औचित्य साधून 'परिमल' भित्तीपत्रक अंकाचे प्रकाशन करताना आम्हाला अत्यंत आंनद होत आहे. शैक्षणिक वर्ष २०२२ – २३ मधील हा दुसरा परिमलचा अंक आम्ही प्रकाशित करीत आहोत. मराठी भाषा ही इंडो-युरोपीय भाषाकुळातील एक भाषा आहे. मराठी ही भारताच्या २२ अधिकृत भाषांपैकी एक आहे. मराठी महाराष्ट्र राज्याची अधिकृत तर गोवा राज्याची सहअधिकृत भाषा आहे. २०११ च्या जनगणनेनुसार, भारतात मराठी भाषकांची एकूण लोकसंख्या सुमारे ९ कोटी आहे. मराठी मातृभाषा असणाऱ्या लोकांच्या संख्येनुसार मराठी ही जगातील दहावी व भारतातील तिसरी भाषा आहे. मराठी भाषा भारताच्या प्राचीन भाषांपैकी एक असून महाराष्ट्री प्राकृतचे आधुनिक रूप आहे. मराठीचे वय सुमारे २२०० वर्ष आहे. महाराष्ट्र हे मराठी भाषिकांचे राज्य म्हणून मराठी भाषेला वेगळे महत्त्व प्राप्त झालेले आहे. आजतागायत मराठी भाषेतून अनेक श्रेष्ठ साहित्यकृती निर्माण झालेल्या आहेत आणि त्यात सातत्यपूर्ण रीतीने भर पडत आहे. भारतीय राज्यघटनेतील २२ अधिकृत भाषांच्या यादीत मराठीचा समावेश आहे. मराठी ही महाराष्ट्र राज्याची एकमेव अधिकृत राजभाषा आहे. गोवा राज्यात कायद्यानुसार कोकणी ही राजभाषा असली तरी मराठीचा वापर शासनाच्या सर्व कारणासाठी होऊ शकतो. शासनाशी मराठीत होणाऱ्या पत्रव्यवहाराचे उत्तर मराठीतच दिले जाते. दादरा व नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशात मराठी एक अधिकृत राजभाषा आहे.

महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांत मराठीच्या उच्च शिक्षणाची सोय आहे तसेच महाराष्ट्राबाहेरील गोवा विद्यापीठ (पणजी), महाराजा सयाजीराव विद्यापीठ (बडोदे), उस्मानिया विद्यापीठ (तेलंगण), गुलबर्गा विद्यापीठ, देवी अहिल्या विद्यापीठ (इंदूर) व जवाहरलाल नेहरू विश्वविद्यालय (नवी दिल्ली) येथे मराठी उच्चशिक्षण विभाग आहेत. महाराष्ट्राबाहेरील एकूण १५ विद्यापीठांमध्ये मराठी शिकविली जाते.

प्रस्तुतचा अंक वाङ्मय मंडळ उद्घाटनाचे औचित्य साधून प्रकशित होत असल्याने यामधील लेख, कविता, निबंध, चारोळी, छायाचित्रे ही मराठी भाषा व साहित्यावर आधारित आहेत. या अंकातील सर्व साहित्य आम्ही विद्यार्थ्यांनी संग्रहित केलेले आहे. यासाठी आम्हाला मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.सिंधू आवळे, प्रा.अंकुश घुले, डॉ.महेश रणदिवे यांचे उत्तम मार्गदर्शन मिळाले. प्रस्तुत अंकातील लेखन साहित्य हे Google वरून संग्रहित केलेले आहे. यातील लेखन साहित्यावर संपादक मंडळातील सदस्य सहभागी असतीलच असे नाही.

जय कर्मवीर I